## मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी.

भुजबळ नॉलेज सिटी मधील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे विशेष हिवाळी श्राम्-संस्कार शिबीर विंचूर गवळी येथे दिनांक ०९ जानेवारी २०१७ ते दिनांक १५ जानेवारी २०१७ या कालावधीत पार पडले. यादरम्यान दिनांक १२ जानेवारी २०१७ रोजी **स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.**

भारतामध्ये **स्वामी विवेकानंद जयंती "युवा दिन" म्हणून साजरी केली जाते आणि ह्याच युवा दिनाचे औचित्य साधून** भुजबळ नॉलेज सिटी मधील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विंचूर-गवळी ह्या गावामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजीत केले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. भारत हा तरुणांचा देश आहे व तरुण हि भारताची सर्वात मोठी शक्ती व उर्जेचा स्त्रोत आहेत आणि ह्याच उर्जेचा उपयोग करून सामाजिक विकास कसा साधता येईल याविषयी डॉ. संजय क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले.

**स्वामी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पवन उदावंत यांनी "स्वामी विवेकानानाद यांचे विचार" या विषयावर व्याख्यान सदर केले व आजची तर्रोन पिढी त्यांच्या समोरील आव्हाने आणि याव्यतिरिक्त एकविसाव्या शतकातही स्वामींचे विचार कसे आदर्श व उपयुक्त आहेत हे विषद केले.**

**कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा.स.यो. स्वयंसेवक प्रणीत मंडलिक याने केले. युवा दिनानिमित्त विंचूर-गवळी गावातील आदिवासी वस्तीमध्ये** गावातील आदिवासी वस्तीमध्ये डॉ. चेतन ठोंबरे (बालरोग तज्ञ) व डॉ. श्रद्धा ठोंबरे (दंतरोग तज्ञ) यांनी गावातील लहान मुलांची तपासणी करून पालकांना मार्गदर्शन केले.

क्षणचित्रे



स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन करतांना प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर




रक्तदान शिबीर



रक्तदान शिबिरात सहभागी झालेले स्वयंसेवक




**बालरोग तपासणी**